# शिष्यवृत्ती

| क्र. | शिष्यवृत्तीचे/ फ्रिशीपचे नाव | अटी व शर्ती | शेरा |
|---|---|---|---|
| १ | भारत सरकारची शिष्यवृत्ती [GOI Scholarship Freeship] | फक्त मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी<br>(S.C./S.T./N.T./V.J./O.B.C. & S.B.C.)<br>ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे (आई-वडिलांचे) मागील आर्थिक वर्षाचे वार्षिक उत्पन्न S.C./S.T. साठी रु. २,००,०००/- पेक्षा कमी आणि N.T./V.J./O.B.C. & S.B.C. या संवर्गासाठी रु. १,००,०००/- पेक्षा कमी आहे असेच विद्यार्थी सदरील शिष्यवृत्तीसाठी अर्ज करू शकतात.<br>१. विद्यार्थ्यांचा स्वत:चा जातीचा दाखला<br>२. विद्यार्थ्यांचा शाळा सोडल्याचा दाखला<br>३. विद्यार्थ्यांची गतवर्षाची गुणपत्रिका (मार्कलिस्ट)<br>४. विद्यार्थ्यांच्या पालकांचा मागील वर्षाचा उत्पन्नाचा दाखला (सन २०१३-२०१४)<br>पालक नोकरी करीत असतील तर इन्कमटॅक्सचा फॉर्म नं. १६ किंवा पूर्ण वर्षाचा पगाराचा दाखला, खाजगी नोकरीत असतील तर ज्या ठिकाणी नोकरी करत असतील त्या ठिकाणचा पगाराचा दाखला आणि तहसीलदाराच्या सहीचा उत्पन्नाचा दाखला, मिळेल त्याप्रमाणे काम असेल तर तहसीलदाराच्या सहीचा उत्पन्नाचा दाखला, उद्योगधंदा असल्यास गतवर्षीचा इन्कमटॅक्स रिटर्नची झेरॉक्स अटेस्टेड<br>५. S.C./S.T. संवर्ग सोडून इतर सर्व संवर्गासाठी नॉनक्रिमीलेअर सर्टिफिकेट<br>६. शैक्षणिक खंड असल्यास गॅप ॲफिडेव्हीट<br>७. शिक्षणासाठी विद्यार्थी दुसऱ्या जिल्ह्यातून आला असल्यास जिल्हाबदल प्रमाणपत्र.<br>८. वसतिगृहात राहत असल्यास त्या वसतिगृहाचे प्रमाणपत्र (राहण्याची व जेवणाची सोय हवी)<br>व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी फक्त S.C. व S.T. या वर्गातील विद्यार्थ्यांनाच समाजकल्याण विभागाकडून शिष्यवृत्तीचा लाभ मिळतो. | सदरील शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाईन भरावे लागतील.<br>www.mahaeschol. maharashtra. gov.in/ escholarship/ loginaspx CBSE/ICSE |
| २ | स्कॉलरशीप फॉर टॅलेन्ट डेव्हलपमेंट इन मॅथमॅटिक्स अॅन्ड फिजिक्स | सदरील शिष्यवृत्ती फक्त F.Y.B.Sc.च्या विद्यार्थ्यांसाठी असते. गणित व भौतिकशास्त्र या विषयात ६०% गुण आवश्यक असणे आवश्यक आहे आणि तेच विषय घेऊन पदवी पूर्ण करावी लागेल. इ. १२वीच्या गुणपत्रकाची छायांकित प्रत जोडावी. | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | राज्य सरकारची नादारी [B.C. Freeship] | फक्त मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी<br>(S.C./S.T./N.T./V.J./O.B.C. & S.B.C.) ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे (आई-वडिलांचे) मागील आर्थिक वर्षाचे वार्षिक उत्पन्न S.C./S.T. साठी रु. २,००,०००/- पेक्षा जास्त आणि N.T./V.J./O.B.C. & S.B.C. या संवर्गासाठी रु. १,००,०००/- पेक्षा जास्त असेल व रु. ४,५०,०००/- पेक्षा कमी असेल (S.C./S.T. संवर्ग सोडून) असे विद्यार्थी (Freeship) साठी अर्ज करू शकतात.<br>१. विद्यार्थ्यांचा स्वत:चा जातीचा दाखला<br>२. विद्यार्थ्यांचा शाळा सोडल्याचा दाखला<br>३. विद्यार्थ्यांची गतवर्षाची गुणपत्रिका (मार्कलिस्ट)<br>४. विद्यार्थ्यांच्या पालकांचा मागील वर्षाचा उत्पन्नाचा दाखला (सन २०१३-२०१४)<br>५. S.C./S.T. संवर्ग सोडून इतर सर्व संवर्गासाठी नॉनक्रिमीलेअर सर्टिफिकेट<br>व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी फक्त S.C. व S.T. या वर्गातील विद्यार्थ्यांनाच समाजकल्याण विभागाकडून नादारीचा लाभ मिळतो. | सदरील शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाईन भरावे लागतील.<br>www.mahaeschol. maharashtra. gov.in/ escholarship/loginaspx CBSE/ICSE |
| ४ | आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांसाठी [E.B.C. Concession] | ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे (आई-वडिलांचे) मागील आर्थिक वर्षाचे वार्षिक उत्पन्न रु. १,००,०००/- पेक्षा कमी आहे असेच विद्यार्थी सदरचे सवलतीचे अर्ज करू शकतात. विशेष कार्यकारी अधिकारी यांचा सही शिक्का आवश्यक (इ. ११वी व १२वी च्या मुली आणि विनाअनुदानित अभ्यासक्रमाचे विद्यार्थी सदरील सवलतीचा अर्ज करू शकत नाही.) | सदरील सवलतीचे अर्ज महाविद्यालयाच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. |
| ५ | प्राथमिक शाळेतील शिक्षकांच्या पाल्यांना मिळणारी फी सवलत [P.T.C. Concession] | ज्या विद्यार्थ्यांचे पालक (आई-वडील) प्राथमिक शाळेत शिक्षक आहेत त्यांच्या पाल्यांना सदरील फी सवलत मिळेल. सदरील अर्जावर मुख्याध्यापक व ज्या अधिकाऱ्याच्या कक्षेत शाळा आहे त्यांची सही व शिक्का आणणे आवश्यक आहे. उदा. : (गटविकास अधिकारी, शिक्षणप्रमुख इ.) | सदरील सवलतीचे अर्ज महाविद्यालयाच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | माध्यमिक व उच्च महाविद्यालयातील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना मिळणारी फी सवलत [S.T.C. Concession] | अनुदानित व सरकारमान्य माध्यमिक व उच्च महाविद्यालयांमध्ये किंवा कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये पूर्णवेळ असणाऱ्या शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना ही फी सवलत मिळते.<br>ज्या पाल्याचे पालक पुणे जिल्ह्याव्यतिरिक्त इतर जिल्ह्यांच्या शाळेत आहेत त्यांनी मा. मुख्याध्यापक व मा. शिक्षणाधिकाऱ्यांची सही घेणे आवश्यक आहे. | सदरील सवलतीचे अर्ज महाविद्यालयाच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. |
| ७ | माजी सैनिकांच्या पाल्यांना मिळणाऱ्या फी सवलती [Ex-Servicemen Concession] | माजी सैनिकांच्या पाल्यांना (एक्स-सर्व्हिसमन कन्सेशन) मिळणारी फी सवलत, कोरे अर्ज घेण्यासाठी जिल्हा सैनिक बोर्डाकडून पालक एक्स-सर्व्हिसमन असल्याचा दाखला आणून देणे आवश्यक आहे. सदरील अर्जावर जिल्हा सैनिक बोर्डाचा सही-शिक्का आणणे आवश्यक आहे. | जिल्हा सैनिक बोर्डातून अर्ज घेऊन त्यावर महाविद्यालयाचा शिक्का घेऊन जिल्हा सैनिक बोर्डाचा सही-शिक्का घ्यावा त्यानंतर महाविद्यालयातील फी सवलतीचा अर्ज घ्यावा. |
| ८ | स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांना व नातवंडांना (हयात नसलेल्या मुलांची) मिळणारी फी सवलत [Freedom Fighter Freeship] | ज्या पाल्यांचे पालक (आई-वडील) स्वातंत्र्य सैनिक असतात त्यांच्याच पाल्यांना ही शिष्यवृत्ती मिळते. या स्वातंत्र्य सैनिकांना शासनाने सन्मानपत्र दिलेले असते. सन्मानपत्राची छायांकित प्रत, मार्कलिस्टची प्रमाणित छायांकित प्रत | सदरील सवलतीचे अर्ज महाविद्यालयाच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. |
| ९ | आजी सैनिकांच्या पाल्यांना मिळणारी फी सवलत Service Personnal Concession | आजी सैनिक जे सध्या सेवेत आहेत त्याच्या पाल्यांना मिळणारी फी सवलत जिल्हा सैनिक बोर्डाकडून कॅटेगरी सर्टिफिकेट (सेवेत असल्याचे प्रमाणपत्र) | सदरील सवलतीचे अर्ज महाविद्यालयाच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. |
| १० | अपंग शिष्यवृत्ती [Physically Handicapped Scholarship] | अर्जासोबत वैद्यकीय दाखला - सिव्हील सर्जन किंवा अर्थोपेडिक यांचे सही-शिक्क्याचा असावा. अर्जदार विद्यार्थी मूकबधीर असेल तर वैद्यकीय दाखला इ.एन.टी. स्पेशलिस्ट डॉक्टरांचे सही-शिक्क्याचा असावा. अर्जदार विद्यार्थी अंध असेल तर वैद्यकीय दाखला आय स्पेशलिस्ट सर्जन/सिव्हील सर्जनचे सही-शिक्क्याचा असावा. अर्जासोबत मागील वर्षाचा उत्पन्नाचा दाखला जोडावा. अर्जासोबत पूर्ण फोटो जोडावा. लगतच्या वार्षिक परीक्षेत विद्यार्थ्यास शेकडा ४०% गुण मिळणे आवश्यक आहे. (त्रिस्तरीय डॉक्टरांची सही, ससून हॉस्पिटल, पुणे यांचा अपंगत्वाचा दाखला) | शिक्षण सहसंचालक उ. शि. पुणे विभाग पुणे १. |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती Central Sector Scholarship | अर्जदार भारतीय नागरिक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. पालकांचे वार्षिक उत्पन्न ४.५० लाखापेक्षा जास्त नसावे. इ.१२वीमध्ये किमान ८०% गुण असावेत. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा. केंद्र शासनाच्या नियमाप्रमाणे अर्जदार नॉन-क्रिमिलेअर वर्गात बसणारा असावा. | www.edu.nic.in www.dirhe.org.in/pms या संकेतस्थळावर सदर अर्ज उपलब्ध आहे. |
| १२ | एकलव्य शिष्यवृत्ती Eklavya Scholarship | ही शिष्यवृत्ती फक्त पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी आहे. विद्यार्थ्याचे पालक भारताचे नागरिक असावे. विद्यार्थ्याचे पालक महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असावे. पालकांचे मागील आर्थिक वर्षाचे उत्पन्न रु. ७५,०००/- असावे.<br>मागील वर्षात T.Y.B.A. व T.Y.B.Com. मध्ये ६० टक्के आणि T.Y.B.Sc. मध्ये ७० टक्के गुण असणे आवश्यक आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षी अनुत्तीर्ण असलेल्या व एटीकेटी मिळालेल्या विद्यार्थ्यांना नुतनीकरण करता येणार नाही. | सदर शिष्यवृत्तीचे अर्ज महाविद्यालयात उपलब्ध आहेत. |
| १३ | अल्पसंख्यांक समाजातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना केंद्र शासनाची मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना Minority Scholarship | मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, पारशी समाजातील विद्यार्थीच या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करू शकतात. अर्जदार भारतीय नागरिक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. किमान ५०% गुण प्राप्त झालेला विद्यार्थी पात्र राहील. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा/स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा. अर्जदाराच्या पालकाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रुपये २ लाखापेक्षा जास्त नसावे. अल्पसंख्यांक कुटुंबातील फक्त दोन अपत्यांनाच सदर योजनेचा लाभ देण्यात येईल. | www.momascholarship.gov.in या संकेतस्थळावर सदरील अर्ज उपलब्ध आहेत. |
| १४ | आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गातील गरीब, गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना अर्थसाहाय्य पुणे विद्यापीठ | अर्जदार भारतीय नागरिक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. अर्जदार इतर कोणतही शिष्यवृत्ती योजनेचा/स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा. विद्यार्थ्यांच्या कुटुंबातील सर्व कमावत्या सदस्यांचे (आई-वडील व इतर) वार्षिक उत्पन्न रु. १,५०,००० लाखापेक्षा जास्त नसावे. मागील परीक्षेत कमीत कमी ६५% टक्के गुण असावे. व ७५% उपस्थिती असावी. | www.unipune.ac.in या संकेतस्थळावर अर्ज उपलब्ध आहेत. |
| १५ | क्रांतीज्योती सावित्रीमाता फुले शिष्यवृत्ती, पुणे विद्यापीठ, पुणे. | ही शिष्यवृत्ती पदवी व पदव्युत्तर अभ्यासासाठी प्रवेश घेतलेल्या फक्त विद्यार्थिनींसाठी आहे. या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थिनीला इतर कोणत्याही शिष्यवृत्तीसाठी अर्ज करता येणार नाही. मागील परीक्षेत कमीत कमी ५०% गुण असावे. मागील वर्षाचे वार्षिक उत्पन्न रु. ७५,०००/- पर्यंत असावे. | www.unipune.ac.in या संकेतस्थळावर सदर अर्ज उपलब्ध आहे. |
| १६ | राजश्री शशहू महाराज शिष्यवृत्ती पुणे विद्यापीठ | ही योजना फक्त मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी लागू होणार आहे. उत्पन्नाची कोणतीही अट नसनू गुणवत्ता हाच निकष म्हणजेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मागील परीक्षेत ६०% गुण असावे. नागरिकत्वाच्या दाखल्याची / आधारकार्डाची साक्षांकित प्रत. विद्यार्थ्यांची उपस्थिती ७५% असणे आवश्यक. | www.edu.nic.in www.dirhe.org.in/pms या संकेतस्थळावर सदर अर्ज उपलब्ध आहे. |
| १७ | पुणे विद्यापीठ गुणवंत विद्यार्थी शिष्यवृत्ती योजना | या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांना ७०% गुण असणे आवश्यक. नागरिकत्वाच्या दाखल्याची / आधारकार्डाची साक्षांकित प्रत. विद्यार्थ्यांची उपस्थिती ७५% असणे आवश्यक. | www.unipune.ac.in या संकेतस्थळावर सदर अर्ज उपलब्ध आहे. |